**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २०९ । बुधवार १३ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून वसुलीसाठी महिलेशी अश्लील भाषा

### एसपींना निवेदन देऊन महिलेने केली कारवाईची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कर्जाचा हप्ता थकलेल्या महिलेशी फायनान्स कंपनीच्या कर्मचा–यांनी गैरवर्तन करून अश्लील भाषा वापरल्याचा आरोप महिलेने केला असून, या संदर्भात एसपींकडे निवेदन देऊन संबंधिताकांवर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

वडगाव गुप्ता येथील या महिलेने बजाज फायनान्स कंपनीकडून हप्त्यावर काही घरगुती वापराच्या वस्तू खरेदी केल्या आहेत. त्याचे हप्ते वेळेवर भरत असताना मागील महिन्यात घरगुती अडचणीमुळे त्यांचा हप्ता वेळेत भरला गेला नाही.

दरम्यान दिनांक ११ मे रोजी दुपारी एकच्या सुमारास बजाज कंपनीचे वसुली प्रतिनिधी गितेश चौरे यांनी वारंवार फोन करून त्रास दिला व नंतर ते महिलेच्या घरी आले. यावेळी घरी महिला एकटीच होती. तिने त्यांना घरी कोणी नाही, नंतर या असे सांगितले. परंतु त्यांनी ऐकले नाही. त्यांनी कंपनीचे वरिष्ठ योगेश वायगंडे यांना फोन लावून त्यांच्याशी बोलण्यास भाग पाडले. त्यांनी फोनवर महिलेशी बोलताना अत्यंत अश्लील भाषा वापरल्याचा आरोप महिलेने केला आहे. त्यामुळे महिलेला मानसिक धक्का बसून तिने या दोघांवर कारवाई करावी, या मागणीसाठी एसपी तसेच एमआयडीसी पोलीस ठाण्यात निवेदन दिले आहे.

## आयात शुल्क वाढविल्याने सोने–चांदीच्या दरात उसळी



**मुंबई । वृत्तसंस्था –** केंद्र सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्क वाढवल्याचा परिणाम आजा बाजारात पाहायला मिळून २४ कॅरेट सोन्याचा दर ८७७९ रुपयांनी वाढला. तर, चांदी देखील २१९८३ रुपयांनी महागली आहे.

सोने दरातील वाढीला सरकारचा एक निर्णय कारणीभूत ठरला आहे. केंद्र सरकारनं सोने आणि चांदीवरील आयात शुल्क वाढवल्याचा परिणाम पाहायला मिळाला. २२ कॅरेट सोन्याच्या दरात ८०४२ रुपयांची वाढ झाली. तर, १८ कॅरेट सोन्याचा दर ६५८४ रुपयांनी वाढला.

एक किलो चांदीच्या दरात २१९८३ रुपयांची वाढ झाली . यामुळं एक किलो चांदीचा दर २९५४५५ रुपयांवर पोहोचला आहे. दुसरीकडे १० ग्रॅम सोन्याचा दर १ लाख ६५ हजारांवर पोहोचला आहे.

■ पान ४ वर

## डीवायएसपींच्या पथकाचा बिंगो जुगार अड्ड्यावर छापा

### दोघांवर गुन्हा । पंचवीस हजारांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या पथकाने तोफखाना पोलीस ठाणे हद्दीतील बिंगो जुगार अड्ड्यावर छापा टाकून कारवाई केली. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, एकूण २५ हजार ८२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १२ रोजी तोफखाना हद्दीतील रानबोके चौक येथील कुबेर मार्केटशेजारी, शांतीदुर्ग अपार्टमेंटच्या बेसमेंट गाळयामध्ये



सुरू असलेल्या बिंगो जुगार अड्ड्यावर पथकाने छापा टाकला. त्यात रोख रक्कम, एलसीडी, माऊस, कीबोर्ड, रेक्झिनचे कापड असा एकूण २५ हजार ८२० रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. ■ पान ४ वर

## ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख यांचे कार्य राज्याला दिशादर्शक - वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के

### सोनईत कौतुकी नदी सुशोभीकरण व पुनर्जीवन कामाचा शुभारंभ; ५१ मुलींच्या शैक्षणिक दत्तक पालकत्व उपक्रमाची घोषणा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** ''ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख यांनी तालुक्याचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि विविध संस्थांच्या उभारणीसाठी दिलेले योगदान मोठे आहे. त्यांचे नेतृत्व केवळ तालुक्यालाच नव्हे, तर राज्याला दिशादर्शक आहे,'' असे प्रतिपादन श्री क्षेत्र ज्ञानेश्वर देवस्थानचे ह.भ.प. वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांनी केले.

ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख यांच्या वाढदिवसानिमित्त सोनई येथे संकल्प दिन साजरा करण्यात आला. मंगळवार, १२ मे २०२६ रोजी या औचित्याने कौतुकी नदीच्या सुशोभीकरण व पुनर्जीवन उपक्रमाचा शुभारंभ महाराज म्हस्के आणि माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या हस्ते करण्यात आला.

**कौतुकी नदीचे पुनर्जीवन आणि १० लाखांची देणगी**

यावेळी बोलताना शंकरराव गडाख म्हणाले की, २०१२ मध्ये प्रशांत गडाख यांनी नदीचे सुशोभीकरण केले होते. मात्र, वाढते नागरीकरण आणि सांडपाण्यामुळे प्रवाहात अडथळे निर्माण झाले आहेत. आता पहिल्या टप्प्यात नदीचे पुनर्जीवन आणि दुसऱ्या टप्प्यात सुशोभीकरण केले जाईल. या कार्यासाठी यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने १० लाख रुपयांच्या देणगीची घोषणा त्यांनी केली. तसेच सोनई गावासाठी नवीन घंटागाडी उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

■ पान ४ वर

## पारनेरच्या वीज प्रश्नांवर मुंबईत उच्चस्तरीय बैठक

### आमदार दातेंची माहिती । धोत्रे येथे २२० के.व्ही. उपकेंद्राला गती : बाभुळवाडा ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढीचे तातडीचे आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेरच्या वीज प्रश्नांवर मुंबईत उच्चस्तरीय बैठक पारनेर तालुक्यातील वाढत्या वीज समस्यांबाबत आमदार काशिनाथ दाते सरांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी महापारेषण संचालक सतीश चव्हाण, कार्यकारी संचालक धनंजय औडेकर, अधिक्षक अभियंता प्लॉनिंग दाभरडे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण उपस्थित होते. बैठकीत पारनेर तालुक्यातील कमी दाबाचा वीजपुरवठा, लांब पल्ल्याच्या ३३ के.व्ही. वाहिन्या, अपुरी ट्रान्सफॉर्मर क्षमता तसेच नवीन उपकेंद्र उभारणी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पारनेर तालुक्यात सध्या सुपा व बाभुळवाडा येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र असून, केडगाव (जि. अहिल्यानगर), शिरूर व आळेफाटा (जि. पुणे) येथूनही विविध ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांना वीजपुरवठा केला जात आहे. मात्र अनेक वाहिन्यांची लांबी ४० ते ५० किलोमीटरपर्यंत ■ पान ४ वर



> धोत्रे येथे मंजूर असलेल्या नवीन २२० के. व्ही. उपकेंद्र तातडीने उभारणीची आवश्यकता आहे, हे उपकेंद्र लवकरात लवकर कार्यान्वित झाल्यास प्रत्येक ३३/११ के.व्ही. उपकेंद्राला स्वतंत्र वाहिनीद्वारे वीजपुरवठा करणे शक्य होणार असून कमी दाब, वारंवार खंडित होणारा पुरवठा व तांत्रिक बिघाडाच्या समस्यांपासून मोठा दिलासा मिळणार असल्याचे ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचे निदर्शनास आणून दिल्याने मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना धोत्रे येथील प्रस्तावित उपकेंद्राचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक बदल करून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहे.
>
> **आ. काशिनाथ दाते सर**
> (विधानसभा सदस्य)

## खा. नीलेश लंके यांना डिस्चार्ज

### मायबाप जनतेचे आशीर्वाद माझ्या पाठीशी । खा. लंके भावुक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** खासदार नीलेश लंके यांना गेल्या आठवड्यात विषाणूजन्य ताप व डिहायड्रेशनचा त्रास झाल्याने पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असताना त्यांच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा झाली असून बुधवारी सायंकाळी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

उपचारादरम्यान रूबी हॉल क्लिनिकच्या वैद्यकीय पथकाने सातत्याने त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवले. विविध वैद्यकीय तपासण्यांचे अहवाल सामान्य आल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना डिस्चार्ज देण्याचा निर्णय घेतला. डॉक्टरांनी काही दिवस विश्रांती



घेण्याचा सल्ला दिला असला तरी खासदार लंके यांनी गुरुवारपासून पुन्हा जनतेच्या सेवेत सक्रिय होणार असल्याचे सांगितले आहे.

मंगळवारी सोशल मीडियावरून नागरिकांशी संवाद साधताना खासदार लंके म्हणाले की, ''जनता हाच माझा ऑक्सिजन आहे. मायबाप जनतेचे आशीर्वाद माझ्या पाठीशी असताना मी पुन्हा जनतेच्या सेवेत

■ पान ४ वर

## ॲड.अच्युत सदाशिव पिंगळे यांचा सहस्त्रचंद्रदर्शन गौरव सोहळा व ''समर्पित'' गौरवांकाचे प्रकाशन

### हिंदू राष्ट्र व राम राज्याचा जाहीरनामा म्हणजे पसायदान । स्वामी स्वामी गोविंददेव गिरी यांचे स्पष्टीकरण,देश तोडण्याचे षडयंत्र सुरू असल्याचा दावा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तब्बल आठशे वर्षानंतर वंगभुमी (पश्चिम बंगाल) स्वतंत्र झाला आहे. तेथे भाजपचा नाहीतर हिंदुत्वाचा विजय झाला आहे. राम राज्य स्थापनेच्या दिशेने हे पाऊल आहे. हिंदू राष्ट्र व राम राज्याचा जाहीरनामा ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान आहे व त्यातील विवेचन ही हिंदुत्ववाद्यांची प्रेरणा आहे, असे प्रतिपादन श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी यांनी मंगळवारी येथे केले. देशाला फुटीचे ग्रहण लागले आहे. प्रांत, भाषा, जाती, संप्रदाय असे भेद करून देशाला तोडण्याचे षडयंत्र दीडशे वर्षापासून सुरू आहे. भारत तेरे टूकडे होंगे अशी भाषा यातूनच येते. त्यामुळेच भारताचे अस्तित्व व सनातन धर्म रक्षणाचे कर्तव्य प्रत्येकाचे आहे, असेही आवाहन त्यांनी केले.

अहिल्यानगर येथील ज्येष्ठ विधीज्ञ ऍड. अच्युतराव सदाशिव पिंगळे यांचा सहस्र चंद्रदर्शन गौरव सोहळा व त्यांच्या जीवनावरील समर्पित गौरव अंकाचे प्रकाशन येथील माऊली सभागृहात स्वामी गोविंददेव गिरी यांच्या हस्ते झाले.यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, राज्यसभा खासदार व विशेष सरकारी वकील अँड.उज्वल निकम,महापौर ज्योती गाडे,सौ.पिंगळे,माजी आमदार चंद्रशेखर कदम,आचार्य महेश व्यास,मोहन बुवा रामदासी, गौरव समितीचे अध्यक्ष अँड.विश्वासराव आठरे, स्वागताध्यक्ष वसंत लोढा, उपाध्यक्ष प्रा.भानुदास बेरड,डी.एम.कुलकर्णी,राजेंद्र गांधी,राजेंद्र चोपडा,राजेंद्र काळे आदी उपस्थित होते.

स्वामी गोविंददेव गिरी हे मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील बेलापूर येथील आहेत. या पार्श्वभूमीवर आणीबाणी व त्यापूर्वीच्या



जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक स्थितीवर त्यांनी भाषणात परखड भाष्य केले. दत्ताजी भाले, दामू अण्णा दाते, दत्तोपंत ठेंगडी आदी संघ स्वयंसेवकांच्या संघर्ष व संघ कार्याच्या आठवणींना उजाळा देताना ते म्हणाले, त्या काळात जिल्ह्यात भयंकर स्थिती होती. लाल बावटाची दहशत होती. आणीबाणीत १९ महिने अनेक जण कारागृहात होते. त्यांच्या आयुष्याची वाताहत व्हावी अशी व्यवस्था केली गेली होती. बलिदान वा सती जाणे एकदाच होते, परंतु वारंवार होणारा अपमान व दिल्या जाणाऱ्या त्रासामुळे संघ सेवकांना रोज बलिदानाला सामोरे जात सती जावे लागत होते.अशा सगळ्या पार्श्वभूमीवर ध्येयप्रेरित आपल्या मार्गावर चालत राहतात व म्हणून मोठे होतात.त्यामुळे संघर्षमय जीवन अनुभवलेल्या ऍड.पिंगळे यांचा सत्कार हा तपस्वी जीवन कृतज्ञतेची पावती आहे.असे गौरव उद्गार स्वामी गोविंद देवगिरी यांनी व्यक्त केले.

**आता खरे स्वातंत्र्य– प्रा.राम शिंदे**

अयोध्यामध्ये राम लल्लाचे मंदिर झाल्याने आता देशाला खरे स्वातंत्र्य मिळाले आहे. संघ कार्य व भाजपचा आता वटवृक्ष झाला असला तरी अच्युतराव पिंगळे यांच्यासारख्या अनेक पारंब्यांनी स्वतःला गाडून घेतले व देशासाठी जीवन समर्पित केल्याने देशात व राज्यात भाजप सरकार आले, असे प्रतिपादन सभापती प्रा. शिंदे यांनी केले. मेहनत, जिद्द व विचारांशी तडजोड न करणाऱ्या ध्येयनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ व्यक्तींचे जीवन समाजासाठी नेहमी प्रेरणादायी असते,असेही त्यांनी स्पष्ट केले.

**इतिहास जाणून घेणार–अँड.उज्वल निकम**

सामान्य माणसासाठीची तळमळ ही आता गुलबाकावलीच्या फुलासारखी दुर्मिळ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयुष्यभर सामान्य व्यक्तींचे हीत जपणारे अँड.पिंगळे यांचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे, असे गौरवोद्गार व्यक्त करून अँड.निकम म्हणाले, अहिल्यानगर शहराचा व जिल्ह्याचा इतिहास ऍड. पिंगळे यांच्याकडून मी जाणून घेणार आहे. यापूर्वीच्या जुन्या सामाजिक वातावरणात त्यांच्यासारख्या अनेकांनी केलेला संघर्ष भावी पिढ्यांसाठी दिशादर्शक आहे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

प्रास्ताविकात वसंत लोढा म्हणाले,अँड.अच्युत पिंगळे यांनी भाजपाचे काम निष्ठेने केले आहे.बँकेच्या हजारो ठेवीदारांना करोडो रुपये मिळवून देण्याकरिता विना मोबदला वकिली केली आहे.एक सर्वसामान्य कार्यकर्ता समाजामध्ये चांगल्या प्रकारे बदल घडू शकतो हे अँड.पिंगळे यांनी दाखवून दिले आहे.श्री. पिंगळे हे पूर्वीपासूनच प्रसिद्धीपासून दूर राहिले आहेत. त्यांचा कार्याचा गौरव व्हावा. यासाठी समितीने गौरव सोहळा आयोजित केला आहे. प.पू.स्वामी गोविंद देवगिरी,अँड.उज्वल निकम सभापती प्रा.राम शिंदे यांच्या उपस्थितीमुळे गौरव सोहळ्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी शुभेच्छा दिल्या.राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा यांनी पिंगळे यांनी नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांची बाजू न्यायालयात प्रभावीपणे मांडून त्यांना मिळवून दिलेल्या न्यायाच्या आठवणी जागवल्या.तसेच विना मोबदला ७० केसेस लढवून ८५% ठेवीदारांना पैसे परत मिळवून दिले आहेत.तसेच एकाही आरोपीला जामीन मिळू दिला नाही.

गौरव समितीचे अध्यक्ष अँड.विश्वासराव आठरे यांनी स्वागत केले.राजेंद्र काळे यांनी ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अधिकमासनिमित्त रायतळ्यात राजेंद्र टाक यांच्या रामकृष्णहरी या त्रिदिन संगीत कथासोहळ्याचे आयोजन



अहिल्यानगर - संत शांतानंदमहाराज आणि पू. महादेवमहाराज काळे यांचे समाधिस्थान असलेल्या पारनेर तालुक्यातील रायतळे येथील आनंदाश्रममध्ये रामकृष्णहरी या त्रिदिन संगीतकथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अधिकमासनिमित्त आयोजित या संगीतकथा सोहळ्याचे कथाअभ्यासक तथा गायक वक्ते राजेंद्र टाक हे कथाप्रवक्ते आहेत. रविवार दि. १७ मे ते मंगळवार दि. १९ मे या दरम्यान रोज सायंकाळी ७:३० ते ९:३० या वेळेत ही कथा होणार असून, महाराष्ट्रातील या पहिल्या आगळ्यावेगळ्या त्रिदिन भक्ती सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन हभप राघवानंद महाराज यांनी केले आहे. श्री टाक हे पहिल्या दिवशी प्रभू श्री रामचंद्र, दुसऱ्या दिवशी श्रीकृष्ण लीला आणि तिसऱ्या दिवशी पांडुरंग परमात्मा व संत महात्म्य विदित करणार आहेत. भगवंताच्या या तिन्ही रूपांचे दर्शन भाविकांना होणार आहे. दररोज कथेनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्योजक बापूसाहेब डोके, ॲड. शिवजीत डोके व गणेश काळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कथा सोहळ्यास प्रारंभ होईल. आनंदाश्रम, रायतळे (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथे होणाऱ्या या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रायतळे आनंदाश्रमाचे सर्व साधकवृंद विशेष परिश्रम घेत आहेत.

### कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या आंदोलनाला माध्यमिक शिक्षक संघाचा पाठिंबा



अहिल्यानगर- कनिष्ठ महाविद्यालयीन संच मान्यतेचे प्रचलित निकष बदलण्याच्या विरोधात महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनास अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने जाहीर पाठिंबा दिला आहे. शैक्षणिक समस्यांसाठी कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक व माध्यमिक शिक्षक सोबत शासनस्तरावर संघर्ष करणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी दिली. संच मान्यतेचे विद्यमान निकष हे अनेक वर्षांपासून शासन निर्णयानुसार कार्यरत असून, कोणतीही व्यापक चर्चा न करता ते बदलण्याचा प्रयत्न होत असल्याने राज्यातील हजारो शिक्षकांच्या नोकरीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर व शिक्षण व्यवस्थेवरही त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.महासंघाने मांडलेल्या मागण्या या शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हिताच्या असून शासनाने त्या सकारात्मकपणे मान्य कराव्यात, अशी आमची मागणी आहे. शिक्षण क्षेत्रातील स्थैर्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शिक्षकांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी प्रचलित संच मान्यता निकष कायम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाने केलेल्या न्याय्य आंदोलनास आमच्या संघटनेचा नैतिक व संघटनात्मक पाठिंबा कायम राहील. या आंदोलनाप्रसंगी दिलेले आश्वासन पाळले नाही व संच मान्यतेसाठी निकषांबाबत सकारात्मक धोरण नसेल तर कनिष्ठ महाविद्यालयीन महासंघासोबत अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ सुद्धा आंदोलनात उतरेल असा इशारा अध्यक्ष सचिन झगडे यांनी दिला आहे. या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे उपाध्यक्ष चांगदेव कडू, एम.एस. लगड, कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे, शिवाजीराव ढाळे, शिक्षक नेते आप्पासाहेब शिंदे , शिरीष टेकाडे, अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे सेक्रेटरी अमोल ठाणगे, खजिनदार अशोक सोनवणे, उपाध्यक्ष भालचंद्र देशमुख, सचिन फटांगरे, प्रसाद शिंदे, सोमनाथ सुंबे, सचिन जाधव, सहसचिव देविदास पालवे, राज जाधव, रावसाहेब शेळके, मोहन यादव, हिशोब तपासणीस संतोष आडकिते, देविदास सातपुते, यांनी देखील पाठिंबा दर्शवला आहे.

# पणजीचा होतोय...बर्थ डे

**बड्डे का काय ते...कसलं फ्याड काढलंय कोण जणू...पण, तुमी यायचं बरं का...म्या म्हातारीचं आवतंण हाये...बड्डे माझाच हाय...जागरण गोंधळ ठिवलाय... पोरीबाळी, नातवंडं-पतवंडं...सारा गोतावळा जमतोय...तेवढंच साऱ्यांच्या डोक्यावरनं मायंचा हात फिरवता येईल वो....वयाची ९९ वर्षे पूर्ण करणाऱ्या गावडेवाडीच्या (ढवळपुरी, ता. पारनेर) श्रीमती सोनाबाई मुरलीधर गावडे या आजीचे बोल ऐकणाऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटवून जातात. नक्की येतो आज्जी असा शब्दही देतात. पण यानिमित्ताने आजीशी बोलताना जुन्या काळच्या त्यांच्या आठवणींनी ऐकणारे आश्चर्यचकित होऊन जातात...**



आई एक नाव असतं...घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं...अशी प्रसिद्ध कवी फ.मु. शिंदे यांची कविता प्रसिद्ध आहे. गावडेवाडीच्या सोनाबाईकडे पाहिल्यावर हीच कविता आईऐवजी आजी म्हणून पाहिली तरी वावगी ठरणारी नाही. कारण, सोनाबाई ही स्वतःच एक गाव आहे. असंख्य जुन्या आठवणींचा खजिना त्यांच्याकडे आहे. डोळ्यांनी दिसणं थोडं कमी झालंय. पण आवाज अजूनही खणखणीत. एक हाळी दिली तरी दीड-दोन किलोमीटरवर बसलेला माणूसही तिला ओ नक्कीच देईल, एवढी ताकद त्यांच्या आवाजात. आयुष्याची ९९ वर्षे पूर्ण होत असताना कधी औषधाची गोळी घेतल्याचे त्यांना आठवत नाही. कोरोना काळात प्रतिबंधात्मक लस द्यायला आलेल्यांना.. नको मला सुई...मला काय झाड भरलीय...काय होत नाय...असले करुना का काय ते रोग अनेक पचवलेत...असं सुनावणाऱ्या सोनाबाई म्हणजे गावडे परिवाराचा आधार आहेत. स्वयंपाक पाणी आता त्या करीत नाहीत, पण धान्य निवडणे, जनावरांना चारा घालणे व मुख्य म्हणजे वस्तीवर येणाऱ्या प्रत्येकाकडे बारीक लक्ष ठेवण्याचे काम इमानेइतबारे करतात. कोण, कुठला, कोणाचा, कोणाकडे आला...असल्या त्यांच्या चौकशा त्यांच्याविषयीचा अनामिक धाक निर्माण करून जातो. त्यामुळे वस्तीवर फिरकण्याआधी दहादा विचार प्रत्येकजण करतो. आजीने पाहिले तर खैर नाही... अशीच भावना त्याची होते.

सोनाबाईला तीन मुले व सात मुली. या सर्वांना आता जावई-सुना आलेत. नातवंडे झालीत. त्यांची लग्नेकार्य होऊन त्यांनाही मुलेबाळे झालीत. त्यामुळे सोनाबाई आता पणजी-खापर पणजी झालीय. तब्बल ८० ते ९०जणांचा गावडे परिवाराचा गोतावळा झालाय. आपल्या घरची शान पणजी सोनाबाईचा ९९वा बर्थ डे दणक्यात साजरा करायचे पतवंडांनी मनावर घेतले व त्यानिमित्ताने उन्हाळ्याच्या सुट्टीत गावाकडं एकत्र जमण्याचंही नियोजन केलं गेलंय. येत्या गुरुवारी (१४ मे) गावडेवाडीत हा सोहळा होतोय. त्यानिमित्ताने जागरण-गोंधळ व मेजवानीही आयोजित केली आहे. सोनाबाईच्या वजनाइतके म्हणजे सुमारे ४५ किलो बुंदीचे लाडूही वाटले जाणार आहेत. आपल्या वाढदिवस सोहळ्याचे आमंत्रण खुद्द सोनाबाईच येणाऱ्या-जाणाऱ्याला आवर्जून देते तेव्हा ऐकणाराही आधी हसतो आणि आवर्जून म्हणतो...आज्जे...नक्की येतो गं तुझ्या बड्डेला....

सोनाबाई मूळच्या अहिल्यानगर शहरातील आनंदीबाजारातील धनगर गल्लीतील. आसराबाई व दगडू महादू टिक्कल यांची ही लेक. शाळेत गेलीच नाही. सात वर्षांची असताना गावडेवाडीच्या मुरलीधर गावडेंशी लग्न झाले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या घराण्यातील चंद्रावती महाराणी होळकर यांच्याशी नातेसंबंध असल्याने टिक्कल-गावडे परिवारासह अनेकजण त्या काळात इंदोरला रोजगारासाठी गेले होते. सोनाबाईचे आई-वडीलही त्यात होते. त्यांच्यासमवेत सोनाबाईही लग्नानंतर तिकडेच गेली. त्यांच्यासमवेत मजुरीची कामे करायची. १२-१३ वर्षांची झाल्यावर गावडेवाडीत सासरी नांदायला आली. त्यानंतर मात्र परत इंदोरला गेली नाही. होळकर राज घराण्याचे प्रधान शंकर गावडे हे सोनाबाईचे चुलत चुलत सासरे. त्यांनी सोनाबाईला गावडे वाडीत जमीन दिली. ती कसत कसत स्वतःच्या मालकीची करून घेण्यात सोनाबाईने तब्बल ३०-३५ वर्षे संघर्ष केला. स्वतःची तीन मुले व सात मुली आणि बहीण तान्हाबाई रावसाहेब नजन यांच्या दोन मुली व एक मुलगा अशा १३ जणांचे विवाह सोनाबाई व तान्हाबाई या दोघी बहिणींनी हिमतीने करून दिले. सोयरिकी पाहण्यापासून ते लग्न लावून देईपर्यंत सारे आम्हीच पाहिले. आमच्या मालकांनी (पती) फक्त व्याह्यांचे हात जोडून स्वागत केले, तेच आमच्यासाठी पुष्कळ होते...असे सोनाबाई सांगते तेव्हा त्यांनी मुला-मुलींचे जन्म, त्यांचे संगोपन, शिक्षण व त्यांचे विवाह लावून देण्यासाठी केलेली धडपड जाणवते.

सोनाबाईकडे आठवणींचा खजिना आहे. जुन्या काळची शेती, पाऊसपाणी, दुष्काळ, खाण्याचे होणारे हाल, मुलांची आजारपणे, पै-पाहुण्यांचा राबता अशा अनेक कडू-गोड आठवणी त्यांच्याकडे आहेत. आयुष्य सारे खेडेगावात गेल्याने त्याकाळचे सामाजिक जीवन, ब्रिटीश कालखंड, भारताची फाळणी, १९४७चे स्वातंत्र्य... यावर त्यांना फारसे भाष्य करता येत नाही. पण ब्रिटीश लोक रेल्वे गाडीतून जाताना त्या गाडीमागे पळणाऱ्या लहान पोरांच्या दिशेने बिस्किटे फेकायचे... एवढे त्यांना आठवते. महात्मा गांधींचे नाव त्या ऐकून होत्या. देश स्वतंत्र झाला म्हणजे नेमके काय झाले, हे आम्हाला काहीच जाणवले नाही, असे त्या आवर्जून सांगतात. इंदिरा गांधींची हत्या झाल्याचे आम्हाला गावात समजले होते व त्यामुळे आमचे बाहेरगावी जाण्याचे रद्द झाल्याचे त्यांच्या आठवणीत आहे.

पुस्तकी नसले तरी पक्के व्यवहार ज्ञान सोनाबाईकडे आहे. अंगी करारीपणा आहे. मालक जाऊन तीस वर्षे झाली तरी कुटुंबाला खंबीरपणे सांभाळून ठेवण्यात त्यांना यश आले आहे. तीन पायली ज्वारी विकल्यावर पाटीभर बाजार घरी घेऊन यायचो, त्यांच्या घरी रोज बाहेरचे चार-पाचजण तर हमखास जेवून जायचे, कोणी उपाशी राहात नव्हते....असा आठवणींचा पट उलगडताना त्यांची सांगण्याची ढब ऐकणाराला मंत्रमुग्ध करते.

मुले नारायण, चंद्रकांत व दत्तात्रय मुरलीधर गावडे, मुली सुशीला देवराम जोशी, सुमन साहेबराव दातीर, भीमाबाई भाऊसाहेब दातीर, द्रोपदाबाई अंजाबापू मंडलिक, मंगल नामदेव दातीर, कमल भाऊसाहेब दातीर व कांता शरद वीरकर तसेच बहीण तान्हाबाई रावसाहेब नजन, राजेंद्र रावसाहेब नजन, निर्मला वसंतराव दातीर, संकेत बाळासाहेब शेंडगे, चेतना प्रशांत थोरात या सर्वांचे परिवार मुला-बाळांनी फुलले आहेत. नातू, नाती, पणतू, पणती असा मोठा गोतावळा सोनाबाईचा झाला आहे. नातवंड-पतवंडांमध्ये डॉक्टर, इंजिनिअर, शासकीय अधिकारी, उद्योजक असे सारे आहेत. घरची म्हातारी... सोनाबाई साऱ्यांचा आधार आहे. तिने खंबीरपणे रोवलेल्या गावडे परिवाराच्या बीजाचा आज वटवृक्ष झाला आहे. त्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सारी मंडळी एकत्र जमत आहेत. ही यानिमित्ताने सोनाबाईच्या कष्टसाध्य आयुष्याविषयीची आगळीवेगळी कृतज्ञताच म्हणावी लागेल. वाढत्या वृद्धाश्रमांच्या सध्याच्या जमान्यात घरातील ज्येष्ठांचा सन्मान करणारी ही कृती समाजाला दिशादर्शक व प्रेरणादायीच ठरो, एवढीच यानिमित्ताने परमेश्वराकडे प्रार्थना.

**निशांत दातीर**
९८५०२०३७४५
अहिल्यानगर

### जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण समितीत दत्ता गाडळकर यांची नियुक्ती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या संनियंत्रण व सल्लागार समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून नगरसेवक तथा जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पालकमंत्री तथा समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते गाडळकर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दिलीप भालसिंग, बाबासाहेब सानप आदी उपस्थित होते.

जिल्हा रुग्णालयातील आरोग्यसेवा अधिक सक्षम, प्रभावी व रुग्णाभिमुख करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने संनियंत्रण व सल्लागार समितीची स्थापना केली आहे. या समितीमध्ये विविध विभागांतील अधिकारी तसेच अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यात आला असून, रुग्णालयातील समस्या, सुविधा आणि प्रशासनातील अडचणी सोडविण्यासाठी समिती महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

दत्ता गाडळकर यांच्या नियुक्तीमुळे जिल्हा रुग्णालयातील औषध पुरवठा, रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, स्वच्छता, वैद्यकीय यंत्रणा, नागरिकांच्या तक्रारी तसेच सर्वसामान्य रुग्णांच्या अडचणी प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यास मदत होणार आहे. जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष म्हणून आरोग्य क्षेत्रातील त्यांचा अनुभव समितीच्या कामकाजासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.शासनाच्या निर्देशानुसार समितीच्या माध्यमातून जिल्हा रुग्णालयातील किरकोळ तसेच महत्त्वाच्या समस्यांवर तातडीने निर्णय घेणे, आवश्यक समन्वय साधणे आणि रुग्णांना वेळेवर व दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विविध विभागांतील अधिकारी समितीत असल्यामुळे प्रशासकीय अडचणी दूर करण्यास गती मिळणार असून, आरोग्य सेवांमध्ये अधिक पारदर्शकता आणि कार्यक्षमता निर्माण होणार आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दत्ता गाडळकर यांचे अभिनंदन करत त्यांच्या माध्यमातून जिल्हा रुग्णालयाच्या विकासकामांना चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.दत्ता गाडळकर म्हणाले की, ''जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण व सल्लागार समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून काम करण्याची संधी दिल्याबद्दल मी राज्य शासन तसेच पालकमंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानतो. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सेवा मिळणे ही काळाची गरज आहे. सर्वसामान्य नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळण्यासाठी राज्य सरकार कटिबध्द आहे. जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांच्या अडचणी समजून घेऊन त्या प्रशासनाच्या माध्यमातून सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले.

या नियुक्तीसाठी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांचे विशेष आभार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालयात औषध उपलब्धता, स्वच्छता, रुग्णसेवा, सुविधा आणि व्यवस्थापन या बाबींवर विशेष लक्ष देऊन रुग्णालय अधिक सक्षम करण्यासाठी समितीमार्फत काम केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### संविधान मूल्यांच्या प्रसारासाठी विजय कांबळे यांचा मुंबईत गौरव

**भारतीय संविधान गौरव पुरस्कार २०२६ प्रदान; सामाजिक कार्याची दखल**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगरचे संरक्षण सचिव तथा सामाजिक कार्यकर्ते विजय लक्ष्मण कांबळे यांना मुंबई येथे आयोजित भव्य सोहळ्यात ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्कार २०२६'' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या गौरवामुळे भिंगार व अहिल्यानगर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नुकतेच मुंबई येथे झालेल्या या विशेष पुरस्कार सोहळ्यात अक्षयजी आंबेडकर व नंदेश विठ्ठल उमाप यांच्या हस्ते विजय कांबळे यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. आशादीप महिला आधार मंच संलग्न 'लेक लाडकी अभियान, महाराष्ट्र राज्य' यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसेवेसाठी कार्यरत असलेल्या व्यक्ती व संस्थांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

विजय कांबळे यांनी भिंगार व अहिल्यानगर परिसरात सामाजिक बांधिलकी जपत अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. समाजातील वंचित, गरजू व दुर्लक्षित घटकांसाठी सातत्याने कार्य करत त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, युवकांमध्ये संविधान जागरूकता निर्माण करणे तसेच सामाजिक ऐक्य आणि बंधुता वृद्धिंगत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती मोहिमा राबवून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला आहे. संविधान मूल्यांचा प्रसार आणि समाजहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले.

यापूर्वी दि. १३ मार्च रोजी विजय कांबळे यांना ''महाराष्ट्र समाजरत्न पुरस्काराने देखिल गौरविण्यात आले होते.

या उल्लेखनीय यशाबद्दल भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, शहराचे शहराध्यक्ष दिपक पाटोळे, बौद्धाचार्य लक्ष्मण माघाडे, युवराज बनसोड, विशाल पवार, वंचित बहुजन आघाडी शहर महासचिव प्रवीण ओरे, भिंगार येथील प्रदीप कर्डक, सुरेश पानपाटील, राजेंद्र पाटोळे, किरण पानपाटील, मिलिंद घाटेशाही, राजीव मोरे, सुभाष पानपाटील, सचिन वाघमारे तसेच भिंगार सिद्धार्थ बुद्ध विहार पंच मंडळाचे व भिंगार व अहिल्यानगर परिसरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध संघटनांकडून विजय कांबळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



अहिल्यानगर राहुरी पाथर्डी तालुका मतदारसंघातील उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डिल यांची आमदार पदी निवड झाल्याबद्दल नगर शहरातील तारकपूर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते जगजीतसिंग गंभीर,बब्बू नवलानी, मयुर मुलतानी,मंन्टी सेठ तलवार, यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केलय (छाया- जाकीर शेख)

### छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील अनधिकृत बॅनर हटवण्याची मागणी

**सकल मराठा समाजाचे प्रशासनाला निवेदन; कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात वारंवार अनधिकृत डिजिटल बॅनर, जाहिरात फलक व होर्डिंग्ज लावले जात असल्याने शिवप्रेमी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ऐतिहासिक वारसा असलेल्या या स्मारकाचे पावित्र्य आणि सौंदर्य बाधित होत असल्याचा आरोप सकल मराठा समाज यांच्या वतीने करण्यात आला आहे.

यासंदर्भात सकल मराठा समाजाच्या वतीने पैठण पोलीस स्टेशन तसेच नगरपरिषद प्रशासनाला लेखी निवेदन देण्यात आले. स्मारक परिसरातील सर्व अनधिकृत बॅनर तात्काळ हटवून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सकल मराठा समाजाने प्रशासनाकडे पुढील मागण्या केल्या आहेत :स्मारक परिसरातील सर्व अनधिकृत बॅनर तात्काळ हटवावेत, संबंधित व्यक्ती व संस्थांवर कायदेशीर कारवाई करावी, स्मारक परिसरात कायमस्वरूपी सूचना फलक लावावेत, परिसर ''नो बॅनर झोन'' घोषित करावा

''छत्रपती शिवाजी महाराज यांचा सन्मान हा प्रत्येक शिवभक्ताचा स्वाभिमान आहे. स्मारक परिसराचे विद्रूपीकरण कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही,'' अशी भूमिका सकल मराठा समाजाने घेतली आहे. प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी पवन शिसोदे, गणेश पवार, सुभाष नवथर, अनिल राऊत, साईनाथ कर्डिले, कृष्णा मोरे, प्रशांत देशमुख, विशाल काळे, महेश पवार, प्रमोद आढाव, किशोर तावरे, सुधाकर सुलताने, मुकुंद ठोसर आदी शिवभक्त उपस्थित होते.

### चांगल्या उपक्रमांसाठी नेहमीच सहकार्य करणार - उदयोजक जितेंद्र बिहाणी

**सामाजिक संस्थांतील मुलांनी घेतला 'आंबे खाण्याचा' आस्वाद : निरंजन सेवाभावी संस्थेचा अभिनव उपक्रम**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** निरंजन सेवाभावी संस्था अनाथ मुला-मुलींना आधार देण्यासाठी त्यांचे भविष्य घडविण्यासाठी प्रयत्नशिल आहेत. अशा संस्थांना मदतीचा हात देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. याच भावनेतून निरंजन सेवाभावी संस्था काम करत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. आज सामाजिक संस्थांतील मुलांना आंबा खाण्याची स्पर्धेचा उपक्रम राबवून त्यांचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच विविध उपक्रमातून मदतीचा हात दिला जातो. अशा उपक्रमामुळे त्यांचा विकास होण्यास नक्कीच मदत होणार आहे. चांगल्या उपक्रमांसाठी नेहमीच सहकार्य करणार असल्याने सामाजिक संस्थांच्या उन्नत्तीसाठी प्रत्येकाने आपआपल्यापरीने वाटा उचलवा, असे प्रतिपादन उदयोजक जितेंद्र बिहाणी यांनी केले.

निरंजन सेवाभावी संस्थेच्यावतीने दरवर्षीप्रमाणे सामाजिक संस्थेतील मुलां-मुलींसाठी आंबे खाण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्रद्धा बिहाणी ,सपना आसावा ,कमलेश झवर, संजय पुगालिया ,अर्चना पुगालिया, सुरेश चांडक ,अतुल डागा ,स्वप्नील कुलकर्णी ,निलेश बिहाणी ,सुमीत चांडक ,राहुल झवर ,मुकुंद धूत ,रविकांत काबरा ,विशाल झवर ,राहुल बजाज ,पवन बंग ,पियुष झवर ,महेश बिहाणी ,सुहास चांडक ,भूषण मालु ,मनीष सोमाणी ,योगेश बजाज ,अभिजीत सारडा ,धीरज डागा, सचिन भंडारी ,प्राजक्ता डागा ,योगिता कुलकर्णी ,अर्चना झवर, श्रुती डागा आदी आदि उपस्थित होते.

उद्योजक जितेंद्र बिहाणी म्हणाले की, निरंजन सेवाभावी संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे उत्कृष्ट काम सुरु असून त्यांचा पुर्ण वर्षभराचा कार्यक्रम हा ठरलेला असतो. आजच्या या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्य चेहर्यावरचा आनंद पाहूण आम्हाला समाधान होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उदयोजक संजय पुगलिया की, निरंजन सेवाभावी संस्था यांचे कार्य राज्यामध्ये उत्कृष्टपणे सुरु असून या संस्थेचा कोणी अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी नाही, त्यामुळे श्रेयवाद घेण्याचा प्रश्नच नाही. सर्व एकत्र राहुन एकदिलाने काम करत आहे. त्यांच्या या कार्याबद्दल प्रदेशचा उत्कृष्ट पुरस्कारही त्यांना प्राप्त झाला आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी जो उपक्रम राबविला आहे. तो खरोखरच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी अतुल डागा म्हणाले, निरंजन संस्थेच्यावतीने नेहमीच सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. यंदाच्यावर्षी संस्थेने अनेक मुला-मुलींचे पालकत्व घेत त्यांच्या सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्याचबरोबरच संस्थेच्या सभासदांच्या आनंदक्षणी मिष्ठान्न भोजन अशा संस्थेतील मुलांना दिले जाते. आजही अशा सामाजिक संस्थेतील मुलांना मनसोक्त आंबे खाण्याचा आनंद मिळवून दिला असल्याचे सांगितले. तसेच या कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक बंगडीवाला परिवार यांनी सहकार्य केले. याप्रसंगी स्नेहालय , सावली संस्था , बालघर प्रकल्प आदी मधील सुमारे २०० मुले-मुली सहभागी झाले होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुकुंद धूत यांनी केले तर आभार स्वप्नील कुलकर्णी यांनी मानले .

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर - ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर- ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. ※संपादक - विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक - तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

# दृष्टीचा दूत: ऑप्टोमेट्री क्षेत्रात करिअरच्या अथांग संधी



अहिल्यानगर - आजच्या डिजिटल युगात स्क्रीन टाइम वाढल्यामुळे डोळ्यांच्या समस्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर, डोळ्यांचे आरोग्य जपणाऱ्या ऑप्टोमेट्रिस्ट या तज्ज्ञांची मागणी प्रचंड वाढली आहे. सेवा, प्रतिष्ठा आणि उज्ज्वल भविष्य देणारे हे क्षेत्र तरुणांसाठी प्रगतीची नवी दारे उघडत आहे. ऑप्टोमेट्री म्हणजे काय? ऑप्टोमेट्री हे डोळ्यांच्या आरोग्याशी संबंधित एक स्वतंत्र प्राथमिक आरोग्य सेवा क्षेत्र आहे. डोळ्यांची तपासणी करणे, दृष्टीदोष (नंबर) शोधणे, चष्मे किंवा कॉन्टॅक्ट लेन्स सुचवणे आणि डोळ्यांच्या आजारांचे प्राथमिक निदान करणे, हे ऑप्टोमेट्रिस्टचे मुख्य काम असते. शिक्षणाची उत्तम संधी: वर्धमान महावीर कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्रीअहिल्यानगर येथील प्रसिद्ध आनंदऋषीजी नेत्रालय संचलित वर्धमान महावीर कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री हे या क्षेत्रातील शिक्षणासाठी एक अग्रगण्य केंद्र बनले आहे. येथे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवाची संधी मिळते.अभ्यासक्रम: डिप्लोमा आणि पदवी कोर्सेस उपलब्ध. संलग्नता: महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्नीत.वैशिष्ट्ये: तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग, अद्ययावत पायाभूत सुविधा आणि अत्याधुनिक लॅबोरेटरीज.प्लेसमेंट नामांकित रुग्णालये आणि ऑप्टिकल कंपन्यांमध्ये १००% प्लेसमेंटसाठी मार्गदर्शन. नोकरी आणि व्यवसायाच्या संधीखाजगी व सरकारी क्षेत्र: मल्टिस्पेशालिटी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि रेल्वे/ लष्करी रुग्णालयांत संधी.स्वतःचा व्यवसाय कमी गुंतवणुकीत स्वतःचे ऑप्टिकल क्लिनिक किंवा शोरूम सुरू करून उद्योजक बनण्याची मोठी संधी.बहुराष्ट्रीय कंपन्या:** लेन्स आणि चष्मा बनवणाऱ्या टायटन आय प्लस, लेन्सकार्ट सारख्या कंपन्यांमध्ये व्यवस्थापकीय पदांवर काम.परदेशात संधी: अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि दुबईसारख्या देशांमध्ये भारतीय ऑप्टोमेट्रिस्टना मोठी मागणी आहे. प्रवेशासाठी आजच संपर्क साधा - वर्धमान महावीर कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री (आनंदऋषीजी नेत्रालय, अहिल्यानगर)संपर्क: ७६६६८ २६४११ (७६६६८२६४११)

# पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचाऱ्यांची विशेष सर्वसाधारण सभेची घोषणा

अहिल्यानगर - पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर यांची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दि. १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या सभेची अधिकृत नोटीस संस्थेकडून प्रसिद्ध करण्यात आली असून सर्व सभासदांना वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सभेचे अध्यक्षस्थान संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष स्वप्नील विजय काळे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे. आथवा अनुपस्थित राहिल्यास उपाध्यक्ष लक्ष्मीकांत बबनराव जाधव हे सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतील. तसेच आवश्यकतेनुसार चेअरमन जगदीश भगवान वाघ व व्हाईस चेअरमन किशोर धोंडीराम सांगळे यांच्या उपस्थितीत सभा पार पडणार आहे. या सभेमध्ये अनेक महत्वाचे विषय मांडण्यात येणार असून त्यामध्ये अध्यक्षांची नियुक्ती, सन २०२५-२६ च्या नफ्याचे सहकार कायद्यानुसार २५ टक्के ऐवजी १० टक्के गंगाजळी वर्गीकरणाबाबत निर्णय, तसेच अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा होणार आहे. सभेच्या शेवटी आभार प्रदर्शन व सभा विसर्जन करण्यात येणार आहे. दरम्यान, गणपूर्ती न झाल्यासही सभा नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येणार असल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. ही सभा संस्थेच्या पुढील कामकाजासाठी दिशा ठरवणारी ठरणार असून सभासदांनी उपस्थित रहावे असे आव्हान उपमुख्य कार्य अधिकारी आनंद परदेशी, व्हा चेअरमन किशोर सांगळे, चेअरमन जगदीश वाघ यांनी केले.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन परिचर्या महाविद्यालयात जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक परिचारिका दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आमच्या परिचारिका, आमचे भविष्य सक्षम परिचारिका जीव वाचवतात या यावर्षीच्या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात परिचारिकांच्या सेवाभाव, समर्पण आणि आरोग्य क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. रामचंद्र पडळकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष श्री. सुनील कटारिया यांची विशेष उपस्थिती लाभली. उपप्राचार्या डॉ. योगिता औताडे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. सलोमी तेलधुने यांनी यावर्षीच्या घोषवाक्याचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वागतपर भाषणात परिचारिका या आरोग्य व्यवस्थेचा कणा असल्याचे सांगण्यात आले. सेवाभाव हीच परिचर्येची खरी ओळख आहे,या प्रेरणादायी विचारांद्वारे परिचारिकांच्या सेवाकार्याचा गौरव करण्यात आला.

रोटरी क्लब अहिल्यानगर सेंट्रल यांच्या वतीने डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन अंतर्गत कॉलेज ऑफ नर्सिंगला ''बेस्ट कॉलेज अवॉर्ड : निःस्वार्थ सेवा'' पुरस्कार प्रदान करण्यात



आला. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य, समाजप्रबोधन उपक्रम तसेच रुग्ण आरोग्य सेवेमधील उल्लेखनीय योगदानाबद्दल हा सन्मान देण्यात आला.

यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि प्राध्यापिकांनाही विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कार्याबद्दल गौरविण्यात आले. डॉ. प्रतिभा चांदेकर यांना ''सर्वोत्कृष्ट संशोधक'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. योगिता औताडे यांना ''सर्वोत्कृष्ट शिक्षणतज्ज्ञ'' पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. अमोल टेमकर आणि प्रा. सलोमी तेलधुने यांना ''सर्वोत्कृष्ट शिक्षक'' पुरस्कार मिळाला. श्री. निलेश म्हस्के आणि श्री. स्वप्नील म्हस्के यांना ''सर्वोत्कृष्ट मार्गदर्शक'' पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच कु. विद्या कुर्हे यांना ''सर्वोत्कृष्ट वर्गशिक्षक'' पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक प्रगती, संशोधन, समुदाय आरोग्य जनजागृती, सामाजिक विस्तार उपक्रम आणि रुग्णसेवा यामधील उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी रोटरी क्लब अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष श्री. सुनील कटारिया आपल्या भाषणात म्हणाले की, फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी १२ मे रोजी आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा केला जातो. त्यांनी आधुनिक परिचर्या सेवेला नवी दिशा देत मानवसेवेचा आदर्श निर्माण केला. महाविद्यालयाच्या कार्याची प्रशंसा करताना त्यांनी परिचारिका शिक्षण क्षेत्रातील योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे सांगितले.

तसेच कार्यक्रमाला रोटरी क्लब अहमदनगर सेंट्रलचे सचिव श्री. अमर गुरव, माजी अध्यक्ष श्री. राजेश परदेशी, मेडिकल डायरेक्टर व क्लब प्रभारी डॉ. श्रेया खजगीवाला तसेच श्री. सुनील मुथा उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध उपक्रम उत्साहात पार पडले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आयोजित ''स्पंदन'' स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपले कलागुण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच नर्सिंग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले. या लघुपटांमधून परिचारिका व्यवसायाचे महत्त्व, रुग्णसेवा आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी प्रभावीपणे मांडण्यात आली.

# ज्ञानसाधना गुरुकुलचा दहावीचा शंभर टक्के निकाल

## कु. दिया कुलट ९५% गुणांसह प्रथम

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ज्ञानसाधना बहुउद्देशीय व सेवाभावी संस्था, केडगाव संचलित ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेस यांनी यंदाही दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये कु. दिया कुलट हिने ९५ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रथमेश गारुडकर याने ९१ टक्के गुणांसह द्वितीय तर प्रीती रासकर हिने ९०.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

याशिवाय हर्षदा दळवी (९०.४०%), अक्षरा पानसंबळ (९०%), आदित्य शिर्के (९०%), अदिती कोठावळे (९०%), आयुष राऊत (८९%), दिव्या रोकडे (८८%), साक्षी कसबे (८६%), श्रावणी कोळी (८६%), आकांक्षा चिपाडे (८५%), वर्षा शिंदे (८४%), रुचिका पाटोळे (८४%), अनुष्का राऊत (८३%), संस्कृती गावडे (८२%), अर्पिता टिमकरे (८२%), श्रेयस शेलार (८२%), शार्दुल धामणे (८२%), सिद्धांत नरवडे (८२%), अक्षरा घोडके (८१%), रुद्र गाडीलकर (८१%), श्रेयस शिंगोटे (८१%), सार्थक देवकर (८०%), कृष्णा देशमुख (८०%), अमृता येळकर (८०%), श्रावणी मतकर (८०%), सर्वेश अंधारे (८०%), हर्ष मोहीम (८०%) यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार ज्ञानसाधना गुरुकुल तसेच केडगाव ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना संस्थेचे संचालक प्रसाद जमदाडे म्हणाले की, ''ज्ञानसाधना गुरुकुलने १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली असून येथील विद्यार्थी दरवर्षी उत्तम यश संपादन करत आहेत. मागील वर्षीप्रमाणे यंदाही मुलीनेच प्रथम क्रमांक पटकावला ही अभिमानाची बाब आहे. पालकांनी मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण द्यावे. 'लेक वाचवा, लेक शिकवा' हा संदेश समाजात रुजविणे आवश्यक आहे.'' यावेळी शिक्षिका प्रतीक्षा फुलारी, पूर्वा ढोरसकर व नक्षत्रा ढोरसकर उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# इंजि.अश्विनी सांगळे - चकोर यांची मृदा व जलसंधारण विभागात अधिकारी पदी निवड

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पारनेर–** ढवळपुरी येथील इंजि.नवनाथ मच्छिन्द्र सांगळे यांची पत्नी अश्विनी नवनाथ सांगळे यांची महाराष्ट्र शासनाच्या मृदा व जलसंधारण विभागात मृदा व जलसंधारण अधिकारी स्थापत्य या पदावर निवड झाली आहे. मृदा व जलसंधारण विभागामार्फत घेण्यात आलेल्या सरळ सेवा परीक्षा अंतर्गत तिची निवड झाली. मृदा व जलसंधारण विभागाअंतर्गत राज्य निवड समिती मार्फत जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रीत) भरती प्रक्रीया-२०२३ द्वारे जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रीत) या पदावर नियुक्तीसाठी निवड झाल्याचे आयुक्त मृदा व जलसंधारण महाराष्ट्र शासन यांनी कळविले आहे.

वैध ठरलेल्या प्रतिक्षा सुचीतील उमेदवाराकडून. नियमानुसार महसुली विभाग संवर्ग वाटपासाठी विकल्प घेण्यात आले असून लवकरच त्यांना नियुक्ती ठिकाण देण्यात येणार आहे. अश्विनी हिने अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग संगमनेर या अभियांत्रिकी महाविद्यालयातून सिव्हिल (स्थापत्य)पदवी घेतली आहे. अहिल्यानगर येथून एमबीए पूर्ण केले आहे. सध्या त्या पारस प्रायव्हेट लिमिटेड मध्ये एच आर म्हणून काम करत होत्या. अश्विनी हिने आपल्या चिकाटी, परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर यश संपादन केले आहे. स्पर्धा परीक्षेच्या कठीण प्रवासातून त्यांनी हे यश मिळवत तरुणांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या निवडीमुळे कुटुंबासह त्यांचे परिसरातून अभिनंदन होत आहे.



त्यांच्या निवडीबद्दल पारनेर नगर मतदार संघाचे आमदार काशिनाथजी दाते सर, पारनेर पंचायत समितीचे सभापती राहुल नंदकुमार झावरे, ढवळपुरी सरपंच नंदाताई भागाजी गावडे, उपसरपंच बबनराव पवार सर , चेअरमन भागाजी गावडे, माजी सरपंच डॉ.राजेश भनगडे, पंचायत समिती सदस्या ताराबाई चौधरी, राजहंस दूध संघाचे व्हाईस चेअरमन राजेंद्र चकोर, लक्ष्मणराव सांगळेसाहेब , अतिरिक्त आरोग्य संचालक डॉ. संदीप सांगळे, सर्जन डॉ रंगनाथ सांगळे,डॉ राजेंद्र आव्हाड, भोंद्रे गावचे माजी सरपंच बबनराव झावरे, विलासराव पालवे,संजय आव्हाड, संतोष चौधरी, अशोक कुटे,होनाजी घोगरे, गोविंद कुटे, संतराम कुटे, विक्रम कुटे, बाबाजी चौधरी, रावसाहेब चौधरी,अजित सांगळे, डॉ गणेश सांगळे, ऍड बाबाजी सांगळे यासह सुतारवाडी ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## २१ तारखेला रिलीज होणाऱ्या देऊळबंद २ ला लाभणार साई-आशीर्वाद

# चिमुकल्या चाहत्यांनी प्रवीण तरडेंना घातला गराडा



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**शिर्डी–** येत्या २१ तारखेला गुरुवारी प्रदर्शित होत असलेला ''देऊळबंद टू'' सिनेमाचे मुख्य कलाकार प्रवीण तरडे यांनी आपल्या पत्नी व चित्रपटाचे निर्माते, कलाकार यांच्यासह शिर्डीत हजेरी लावत साईबाबांचे मनोभावे दर्शन घेतले व या चित्रपटाला साईबाबांचे आशीर्वाद लाभो अशी प्रार्थना यावेळी केलीय. मुळशी पॅटर्न व देऊळबंद चित्रपटानंतर महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचलेले प्रवीण तरडे बाबांच्या दर्शनासाठी आल्याचे समजताच त्यांच्या चाहत्यांनी त्यांना पाहण्यासाठी व एक सेल्फी काढण्यासाठी एकच गर्दी केली यावेळी विशेषतः चिमुकल्या मुलामुलींनी मोठी गर्दी करत फोटोसेशन केले

यानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने प्रवीण तरडे व देऊळबंद च्या टीमचा श्री साईबाबांची शाल व प्रसाद देत सत्कार करण्यात आला पत्रकारांशी बोलतांना त्यांनी चित्रपटाविषयी माहिती देत येत्या २१ तारखेला गुरुवारी प्रदर्शित होणार असलेला हा शेतकऱ्यांची व्यथा मांडणारा चित्रपट प्रत्येकाने आवर्जून पाहण्याची विनंती यावेळी प्रवीण तरडे यांनी केली.

# प्रियदर्शनी पब्लिक स्कूल; दहावीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल इयत्ता १०वी चा निकाल ९८.६३% लागला.शाळेच्या निकालाची परंपरा कायम ठेवून अनुष्का संतोष बिदे या विद्यार्थिनीने ९४.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला. तसेच गोसावी समृद्धी योगेश ९३.६०%, तरवडे देवयानी सचिन ९२.८०%,आळकुटे प्रज्वल सोमनाथ ९०.२०%,आणि नगरे कशिश निलेश ८९.६०% गुण मिळवून शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला.



संस्थेचे अध्यक्ष श्री बाळासाहेब खोमणे सर, कॉलेजच्या प्राचार्य श्रीमती अंजली बोधक मॅडम, उपप्राचार्य श्री अमोल घोरपडे सर व पर्यवेक्षक कु.अनिता थापा मॅडम आणि सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शिर्डीत कलाविष्कार २०२६ चा सोहळा; धनश्रीताई विखे पाटील यांच्याकडून भेट देत 'आयडॉल इव्हेंटला' शुभेच्छा

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिर्डी शहरात प्रथमच आयडॉल इव्हेंटच्या वतीने भव्य कलाविष्कार २०२६ या अनोख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्षा मा. सौ. धनश्रीताई विखे पाटील यांनी नुकतीच आयडॉल इव्हेंटच्या टीमला भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. विखे पाटील कुटुंब नेहमीच कलाकारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले असून, याही कार्यक्रमासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

ग्रामीण भागातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी शिर्डीतील ट्विंकल लोढा आणि हर्षवर्धन जोशी यांनी आपल्या टीमच्या माध्यमातून या स्पर्धेचे नियोजन केले आहे. यामध्ये (गायन), (नृत्य) आणि इतर विविध कलागुणांना वाव दिला जाणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात अशा प्रकारचा स्तुत्य उपक्रम होत असल्याबद्दल सौ. धनश्रीताई विखे पाटील यांनी आयोजकांचे विशेष आभार मानले.




या स्पर्धेसाठी वयाची कोणतीही अट ठेवण्यात आलेली नाही. ५ मे ते ५ जून या कालावधीत पहिल्या फेरीसाठी नावनोंदणी प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यानंतर हॉटेल जे. के. पॅलेस येथे तीन टप्प्यांत ऑडिशन पार पडतील. ऑडिशनमधून निवडल्या गेलेल्या अंतिम १२० कलाकारांना साईबाबा ऑडिटोरियम येथे होणाऱ्या महाअंतिम फेरीत (फायनल राऊंड) आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे.
शिर्डी व परिसरातील जास्तीत जास्त कलाकार आणि कलाप्रेमींनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक ट्विंकल लोढा, हर्षवर्धन जोशी आणि त्यांच्या टीमने केले आहे.

# पत्रकारांच्या संरक्षणासाठी केंद्रीय पत्रकार संघाची भेट

## पोलीस अधीक्षकांना दिले निवेदन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**नेवासा–** पत्रकारांवर होणारे हल्ले आणि दाखल होणारे खोटे गुन्हे या पार्श्वभूमीवर, पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य प्रभारी कमलेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. पत्रकारांना संरक्षण मिळावे आणि पत्रकार संरक्षण कायद्याची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.



निवेदनातील प्रमुख मागण्या:

चौकशीशिवाय गुन्हे नकोत: पत्रकारांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यापूर्वी, विभागीय पोलीस अधिकारी किंवा वरिष्ठ स्तरावर त्याची सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशीअंती तथ्य आढळल्यास पुढील कारवाई करावी, जेणेकरून खोट्या तक्रारींना आळा बसेल.

पत्रकार संरक्षण कायदा: महाराष्ट्र राज्यात लागू असलेल्या पत्रकार संरक्षण कायद्याची अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये कडक आणि प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

दडपशाहीला आळा: पत्रकारितेचे कर्तव्य बजावताना पत्रकारांना लक्ष्य केले जाण्याचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत पोलीस प्रशासनाने पत्रकारांना योग्य संरक्षण देऊन लोकशाहीचा चौथा स्तंभ अबाधित ठेवावा.

यावेळी बोलताना राज्य प्रभारी कमलेश मोगल यांनी सांगितले की, 'अनेकदा वैयक्तिक आकसापोटी किंवा बातम्यांचा वचपा काढण्यासाठी पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे पत्रकारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून, पोलीस प्रशासनाने अशा प्रकरणांत संवेदनशीलतेने लक्ष घालणे गरजेचे आहे.'

जिल्हा पोलीस अधीक्षकांनी निवेदन स्वीकारून सकारात्मक चर्चा केली असून, जिल्ह्यामध्ये पत्रकार संरक्षण कायद्याबाबत योग्य ती पावले उचलली जातील, असे आश्वासन दिले आहे. याप्रसंगी जिल्ह्यातील पत्रकार आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# शनि जयंतीनिमित्त माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ट्रस्टतर्फे शनि मारुती मंदिर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शनि जयंती, अमावस्या आणि शनिवार असा दुर्मिळ व अत्यंत पवित्र योग यंदा एकाच दिवशी येत असल्याने शहरातील माळीवाडा येथील शनि मारुती मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ट्रस्टच्या वतीने शनिवार दिनांक १६ मे रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून भाविकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शनि जयंतीच्या निमित्ताने मंदिर परिसराची आकर्षक रंगरंगोटी करण्यात आली असून मंदिरावर विद्युत रोषणाई करून संपूर्ण परिसर उजळून निघाला आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन ट्रस्टच्या वतीने भव्य मंडप उभारण्यात येणार आहे. तसेच उन्हाची तीव्रता लक्षात घेता भाविकांसाठी थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून मंदिर परिसरात यासाठी विशेष मॅटची व्यवस्था करण्यात आली आहे. ट्रस्टच्या या नियोजनाचे भाविकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

या पवित्र दिनानिमित्त शनिवार दिनांक १६ मे रोजी पहाटे ५ वाजता अभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. सकाळी ६ वाजता आरती व त्यानंतर प्रसाद वाटप करण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता महाआरती तर सायंकाळी ७ वाजता सायंआरती आयोजित करण्यात आली आहे. याशिवाय दिवसभर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती देवस्थान ट्रस्टच्या वतीने देण्यात आली.

या धार्मिक कार्यक्रमांचे पौराहित्य गुरुजी आनंद पांडे हे करणार असून संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. शनि जयंतीच्या निमित्ताने शहरासह परिसरातील हजारो भाविक दर्शनासाठी उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. धार्मिक वातावरणात भक्तांना आध्यात्मिक ऊर्जा मिळावी तसेच सामाजिक एकोपाही वृद्धिंगत व्हावा, या उद्देशाने ट्रस्टकडून नियोजनबद्ध तयारी करण्यात आली आहे.

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे , विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, विजय कोथिंबीरे , रंगनाथ फुलसौंदर, ज्ञानेश्वर रासकर, हरिश्चंद्र गिरमे, चंद्रकांत फुलारी, बापूसाहेब एकाडे, प्रा. माणिकराव विधाते, संजय चाफे, नितीन पुंड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.
शनि जयंती, अमावस्या आणि शनिवार या त्रिवेणी योगाचे धार्मिक दृष्ट्या विशेष महत्त्व असल्याने भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन, धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे

# शिक्षक आमदार किशोर दराडे यांची अहिल्यानगरमध्ये शुक्रवारी प्रलंबित प्रश्नांवर बैठक

## शिक्षण विभागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी होणार थेट सुनावणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक आयोजित करण्यात आले आहे. ही बैठक शुक्रवार दि. १५ मे रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील शासकीय विश्रामगृह येथे पार पडणार असल्याची माहिती त्यांचे स्वीय सहाय्यक हरीष मुंढे व वैभव सांगळे यांनी दिली. या बैठकीस माध्यमिक शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक तसेच लेखाधिकारी शिक्षण विभाग उपस्थित राहणार असून, शिक्षण विभागाशी संबंधित प्रलंबित कामांबाबत थेट चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील ज्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकरणे प्रलंबित असतील त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच संबंधितांनी आपल्या समस्या, तक्रारी अथवा प्रश्न बैठकीपूर्वी व्हॉट्सॲपद्वारे पाठवावेत, असेही सांगण्यात आले आहे. स्वीय सहाय्यक हरीष मुंढे यांच्या व्हॉट्सॲप क्रमांक ७५८८०१४००५ आणि ८२७५५२२५२६ वर प्रश्न पाठविण्याचे सांगण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर संघटनांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या बैठकीस उपस्थित राहून विविध प्रश्न मांडावेत, असे आमदार दराडे यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या बैठकीमुळे शिक्षण विभागातील रखडलेली प्रकरणे, वेतन, सेवा विषयक अडचणी तसेच प्रशासकीय प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले जाणार आहे.

### शहरात महाराणा प्रतापससिंह यांची ४८६ वी जयंती साजरी

# महाराणा प्रताप यांचे जीवन हे शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च उदाहरण -आ. संग्राम जगताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** राष्ट्रगौरव, स्वाभिमान आणि मातृभूमीप्रेमाचे प्रतीक असलेले वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची ४८६ वी जयंती अहिल्यानगरमध्ये 'राजपूत समाज सेवा संस्था'च्या वतीने भव्य उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संग्राम जगताप उपस्थित होते. अहिल्यानगरमधील राजपूत समाज या जयंती सोहळ्यानिमित्त एकत्र आले होते.

प्रारंभी महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष इंजिनिअर रोहनसिंह परदेशी यांनी उपस्थितांचे स्वागत करत म्हणाले, महाराणा प्रताप हे शौर्य, स्वाभिमान आणि मातृभूमीप्रेमाचे सर्वोच्च प्रतीक आहेत. त्यांचे जीवन तरुण पिढीसाठी प्रेरणास्थान आहे. आज आपण त्यांचा आदर करत त्यांच्या शौर्याचा सन्मान करण्यासाठी एकत्र आलो आहोत.

या जयंती सोहळ्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्रसिंह चौहान,सचिव मोहनसिंह ठाकूर, खजिनदार विशालसिंह परदेशी, तसेच सदस्य किसनसिंह परदेशी, चेतनसिंह परदेशी, अमितसिंह परदेशी, कुंदन परदेशी, यशसिंह ठाकूर, भाऊ परदेशी, अमोल ठाकूर, हर्षल परदेशी, किशोरसिंह परदेशी, संग्रामसिंह परदेशी, किशोरसिंह राजपूत, प्रतापसिंह परदेशी, ईश्वरसिंह परदेशी, परीक्षितसिंह ठाकूर, सचिन परदेशी, अमित चंदेले, प्रसाद परदेशी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष योगदान दिले.

जयंती उत्सवानिमित्त राजपूत समाज सेवा संस्थेच्या वतीने रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर विविध सामाजिक उपक्रम यांच्यासह पारंपरिक संगीत, नृत्य व राजपूत समाजाचे सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. महाराणा प्रतापांच्या शौर्याची आठवण देणारी मिरवणुक देखील उत्साहात पार पडली. इतिहासावर आधारित भाषणे व प्रेरक व्याख्याने झाली. उपस्थित समाजबांधवांनी पारंपरिक राजपूत खाद्य पदार्थांचा आस्वाद घेतला.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महाराणा प्रताप यांचे जीवन हे शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांच्या विचारातून युवकांनी समाज आणि राष्ट्रहितासाठी कार्य करावे. अशा महापुरुषांच्या जयंती उत्सवांमुळे इतिहास जिवंत राहतो आणि नव्या पिढीला दिशा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

# जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण व सल्लागार समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे रुग्णांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी तसेच रुग्णालयातील विविध समस्या व अडचणी तातडीने सोडविण्यास मदत व्हावी या उद्देशाने संनियंत्रण व सल्लागार समिती गठीत करण्यात आली असून या समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार तसेच मा. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांच्या मंजूर टिपणीनुसार ही नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय डी. घोगरे यांनी दिली.

या समितीवर नगरसेवक दत्तात्रय गाडळकर, सामाजिक कार्यकर्त्या सविता मोरे, सामाजिक कार्यकर्ते ॲड. लक्ष्मण पोकळे तसेच अशासकीय संस्था प्रतिनिधी राजेश सुरेशलाल परदेशी यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. समितीच्या माध्यमातून रुग्णालयातील विविध प्रशासकीय व आरोग्यविषयक बाबींवर समन्वय साधून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

जिल्हा रुग्णालयात विविध विभागांतील अधिकारी समितीमध्ये सहभागी असल्यामुळे किरकोळ अडचणी त्वरित मार्गी लावणे शक्य होणार असून रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी समिती महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. तसेच समितीच्या बैठका मा. पालकमंत्री तथा अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार असून संबंधित सदस्यांनी प्रत्येक बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, नियुक्तीपत्र प्रदान करताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्या हस्ते ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी पत्र स्वीकारले. यावेळी सहाय्यक अधिकारी राहुल साबळे, डॉ. संदीप पोखरे आदी उपस्थित होते. समितीच्या स्थापनेमुळे जिल्हा रुग्णालयातील कामकाज अधिक गतिमान होऊन रुग्णांना सुलभ व प्रभावी आरोग्यसेवा मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवात राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेचे आयोजन

## २२ मे रोजी न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये अंतिम फेरी; २५ स्पर्धकांना संधी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३१ मे २०२६ रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिन अंतर्गत राज्यस्तरीय खुल्या वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमुळे राज्यभरातील विद्यार्थ्यांना व नागरिकांना आपले विचार मांडण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

या वकृत्व स्पर्धेची अंतिम फेरी शुक्रवार, दिनांक २२ मे रोजी सकाळी १० वाजता शहरातील न्यू आर्ट्स कॉलेजच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहात संपन्न होणार आहे. प्राथमिक फेरीतून निवडलेल्या २५ स्पर्धकांना अंतिम फेरीत सहभागी होता येणार आहे.

स्पर्धेसाठी निवडण्यात आलेले विषय हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर आधारित असून त्यामध्ये - १) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : एक कुशल प्रशासक २) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य ३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : महिला सबलीकरणाचे प्रतीक ४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रतीक हे विषय देण्यात आले आहेत.

स्पर्धा दोन टप्प्यांत होणार असून प्राथमिक फेरीसाठी स्पर्धकांनी निवडलेल्या विषयावर जास्तीत जास्त चार मिनिटांचा स्वतःचा भाषणाचा व्हिडिओ तयार करून दिनांक १५ मे २०२६ पर्यंत पाठवणे बंधनकारक आहे. प्राप्त व्हिडिओंचे परीक्षण करून अंतिम फेरीसाठी २५ स्पर्धकांची निवड केली जाईल.

ही स्पर्धा वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच १८ वर्षांवरील सर्वांसाठी खुली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी आपले व्हिडिओ पुष्कर कुलकर्णी (८८३०१५९०८३), ऐश्वर्या सागडे (८०८०७२८५३२) आणि चंद्रकांत तागड (९४२२२२१५३२) या क्रमांकावर पाठवावेत, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली असून प्रथम क्रमांकाला १० हजार रुपये व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकाला ७ हजार रुपये व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांकाला ५ हजार रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच उत्तेजनार्थ प्रथम क्रमांकाला २ हजार रुपये व प्रमाणपत्र, तर द्वितीय क्रमांकाला १ हजार रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कौशल्य विकसित होण्यास चालना मिळणार असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा सखोल अभ्यास करण्याची संधीही मिळणार आहे, अशी माहिती पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

# बेरोजगार युवक-युवतींसाठी ४५ दिवसीय मोफत व्यावसायिक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

## माय भारत व प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राचा उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींसाठी कौशल्याधारित प्रशिक्षणासह रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या माय भारत आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन संचलित प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राच्या संयुक्त विद्यमाने ४५ दिवसांच्या मोफत कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



या उपक्रमांतर्गत प्लंबिंग मल्टी स्किल तसेच सीएनसी मशीन ऑपरेटिंग या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण दिले जाणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर युवक-युवतींना रोजगाराच्या संधीही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. बेरोजगार तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन माय भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष आणि प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राच्या व्यवस्थापक दिवाकर भोयर यांनी केले आहे.

विशेष म्हणजे हे दोन्ही प्रशिक्षण कोर्स निवासी स्वरूपाचे असून, प्रशिक्षणादरम्यान राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था आयोजकांकडून करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्यही मोफत पुरविण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवतींनाही या प्रशिक्षणाचा लाभ घेणे सोपे होणार आहे.

या प्रशिक्षणासाठी किमान शैक्षणिक पात्रता दहावी उत्तीर्ण अशी ठेवण्यात आली असून, निवडलेल्या कोर्सनुसार पात्रता निश्चित केली जाणार आहे. अर्जदारांचे वय १८ ते ३० वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी मार्कशीट, आधार कार्ड, टी. सी. आणि सहा पासपोर्ट आकाराचे फोटो आवश्यक राहणार आहेत.

प्रशिक्षणाचे आयोजन नगर-पुणे रोडवरील स्माईल स्टोन हॉटेलजवळ, कामरगाव (ता. नगर, जि. अहिल्यानगर) येथे करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक असून, नोंदणीची अंतिम तारीख १४ मे निश्चित करण्यात आली आहे. जागा मर्यादित असल्याने प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे.

या कार्यशाळेत अनुभवी व प्रशिक्षित शिक्षकांकडून प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले जाणार आहे. तांत्रिक कौशल्यांसोबतच व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य आणि व्यावसायिक शिस्त यांसारख्या बाबींवरही विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यास या उपक्रमाची मोठी मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. अधिक माहितीसाठी श्रीकृष्ण मुरकुटे (मो. ९२२५७७६९९५) यांच्याशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे नेमकं काय? सामान्य माणसासाठी सोप्या शब्दांत



आज आपण ज्या काळात जगतो आहोत तो काळ तंत्रज्ञानाचा आहे. मोबाईल, इंटरनेट, ॲप्स याशिवाय आपले रोजचे आयुष्य चालतच नाही. याच तंत्रज्ञानामध्ये सध्या सर्वात जास्त चर्चेत असलेला शब्द म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. पण अनेक सामान्य लोकांसाठी हा शब्द अजूनही गोंधळात टाकणारा आहे.

**म्हणजे नेमकं काय?**

म्हणजे अशी प्रणाली किंवा संगणकीय तंत्रज्ञान जी माणसासारखे विचार करू शकते, शिकू शकते आणि निर्णय घेऊ शकते. माणूस अनुभवातून शिकतो, चुका सुधारतो, आणि पुढच्या वेळी अधिक चांगला निर्णय घेतो. देखील हाच प्रकार करते, पण डेटा आणि गणिती सूत्रांच्या मदतीने.

सोप्या उदाहरणात सांगायचं तर जर एखाद्या मशीनला हजारो फोटो दाखवले आणि सांगितले की हे मांजर आहेत, हे कुत्रे आहेत, तर काही काळानंतर ती मशीन नवीन फोटो पाहून स्वतः सांगू शकते की हा मांजर आहे की कुत्रा. हेच .

आपल्याला वाटते की ही भविष्यात येणारी गोष्ट आहे. पण प्रत्यक्षात ती आपल्या आयुष्यात आधीपासूनच आहे. आपण मोबाईलमध्ये '' '' किंवा '''' म्हणतो तेव्हा आपला आवाज ओळखून उत्तर देणारी प्रणाली आहे. यूट्यूबवर आपल्याला आवडतील असे व्हिडिओ दाखवणारे अल्गोरिदम वर चालतात. ऑनलाइन शॉपिंगमध्ये ''तुम्हाला हे देखील आवडेल'' अशा सूचना मुळेच मिळतात.

माणसासाठी का महत्त्वाची आहे?

कारण वेळ वाचवते, काम सोपे करते आणि अचूकता वाढवते. पूर्वी एखाद्या कामासाठी अनेक लोक लागायचे. आता तेच काम काही सेकंदात संगणक करतो. उदाहरणार्थ, हजारो कागदपत्रांमधून माहिती शोधणे, भाषांतर करणे, फोटो एडिट करणे.

काही लोकांना वाटते की माणसाच्या नोकऱ्या हिरावून घेईल. पण खरं पाहिलं तर प्रत्येक नवीन तंत्रज्ञान आल्यावर अशी भीती निर्माण झाली आहे. जेव्हा संगणक आले, तेव्हा देखील असेच वाटले होते. पण संगणकामुळे लाखो नवीन नोकऱ्या तयार झाल्या. बाबतीतही हेच होणार आहे.

माणसाची जागा घेत नाही, तर माणसाला अधिक सक्षम बनवते. डॉक्टर चा वापर करून आजार लवकर ओळखू शकतात. शेतकरी पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी वापरू शकतात. शिक्षक विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या पद्धतीने शिकवू शकतात.

सामान्य माणसाने पासून घाबरण्याची गरज नाही. उलट समजून घेणे, तिचा योग्य वापर करणे हे आजच्या काळाचे महत्त्वाचे कौशल्य आहे. म्हणजे धोका नाही, तर योग्य वापर केला तर मोठी संधी आहे.

(पान १ वरून)

## आयात शुल्क वाढविल्याने सोने-चांदीच्या दरात उसळी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक वर्षासाठी सोने आणि चांदी खरेदी करु नये असं आवाहन केलं होतं. मोदींच्या आवाहनापासून तीन दिवसात सोन्याचे दर ९३३३ रुपयांनी महागले आहेत. तर, चांदीच्या दरात ३१२५० रुपयांची वाढ झाली आहे.आयबीजेएकडून दिवसातून दोन वेळा सोन्याचे दर जारी केले जातात. २२ कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचादर १४६९३७ रुपयांवर पोहोचला आहे. जीएसटीसह हा दर १५१३४५ रुपयांवर जातो. तर, १८ कॅरेट सोन्याचादर जीएसटीशिवाय १२०३०८ रुपयांवर आहे, तर जीएसटीसह सोन्याचादर १२३९०७ रुपयांवर आहे.

## ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख यांचे कार्य राज्याला दिशादर्शक - वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के

५१ गरजू मुलींचे शैक्षणिक पालकत्व सामाजिक दायित्वाचा वारसा जपत यशवंत प्रतिष्ठानने आजवर ११५ मुलींचे शैक्षणिक दत्तक पालकत्व स्वीकारले आहे. याच उपक्रमाचा विस्तार करत या संकल्प दिनानिमित्त तालुक्यातील आणखी ५१ गरजू मुलींचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्याची घोषणा शंकरराव गडाख यांनी केली.

**विविध सामाजिक उपक्रमांचा जागर**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबा अनारसे यांनी केले. गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात दत्तकग्राम, गाव तिथे वाचनालय, संकल्प साध्या विवाहाचा, मरणोत्तर नेत्रदान आणि वृक्षारोपण यांसारखे उपक्रम राबवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी माजी आमदार पांडुरंग अभंग, कारभारी जावळे, प्रकाश शेटे, नागेश आघाव, डॉ. रामनाथ बडे, गफूर बागवान यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला विश्वासराव गडाख, सुनीलराव गडाख, अशोकराव गायकवाड, तुकाराम शेंडे, जबाजी फाटके यांच्यासह नेवासा तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, सरपंच, नगरसेवक आणि हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.कौतुकी सुशोभीकरणासाठी नंदकुमार पाटील, ॲड. आण्णासाहेब आंबाडे व इस्माईल शेख यांनीही देणगी जाहीर केली. उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

## डीवायएसपींच्या पथकाचा बिंगो जुगार अड्ड्यावर छापा

या प्रकरणी बिंगोचालक अमोल टिल्लू गायकवाड (वय-४२, रा. कॅम्प कौलारु, सर्जेपुरा) व जुगार खेळणारा इम्रान इलियास शेख (वय-२४ रा. शिवाजीनगर, कल्याण रोड, नगर) या दोघांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली डीवायएसपी डॉ. दिलीप टिपरसे, तसेच पथकातील पोहेकॉ राजू आप्पा जाधव, पोहेकॉ महेश मगर, पोना हेमंत खंडागळे, पोकॉ सागर द्वारके यांच्या पथकाने केली.

## पारनेरच्या वीज प्रश्नांवर मुंबईत उच्चस्तरीय बैठक

असल्याने कमी दाबाने वीजपुरवठा, वारंवार तांत्रिक बिघाड आणि दुरुस्तीसाठी होणारा विलंब यामुळे ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे आमदार दाते यांच्या माध्यमातून बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले.आळेफाटा येथून येणाऱ्या ३३ के. व्ही. वाहिनीवर अळकुटी, आणे, पळसपूर व वारणवाडी अशी चार उपकेंद्रे जोडलेली असून या वाहिनीची लांबी तब्बल ५० कि.मी. आहे. तसेच बाभुळवाडा येथून निघणाऱ्या सहा वाहिन्यांवर कान्हूर पठार, टाकळी ढोकेश्वर व निघोज परिसरातील प्रत्येकी दोन उपकेंद्रे जोडलेली आहेत. केडगाव येथून येणाऱ्या वाहिनीवर भाळवणी, गोरेगाव व ढवळपुरी ही उपकेंद्रे जोडलेली असून वाहिन्यांचे अंतर जास्त असल्याने वारंवार अडचणी निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. वडगाव सावताळ वनकुटे परिसरातील नवीन सबस्टेशनच्या मागणीबाबतही सकारात्मक चर्चा झाली. संबंधित प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना देत त्यावर लवकरच कार्यवाही केली जाईल, असा विश्वास मंत्री बोर्डीकर यांनी व्यक्त केला तर खडकवाडी व अळकुटी येथे नवीन सेक्शनच्या मागणीवर ग्राहकसंख्येचा आढावा घेऊन निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. दरम्यान, बाभुळवाडा येथील १३२ के.व्ही. उपकेंद्रात सध्या कार्यरत असलेल्या २५ क्षमतेच्या दोन पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवून प्रत्येकी ५० करण्यास मंजुरी मिळालेली असून त्याची अंमलबजावणी रखडल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. यावर मंत्री बोर्डीकर यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईवरही नाराजी व्यक्त करत संबंधित ठेकेदारांना कामे जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले असून या बैठकीमुळे पारनेर तालुक्यातील दीर्घकालीन वीज समस्यांच्या निराकरणाला गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## खा. नीलेश लंके यांना डिस्चार्ज

रुजू होणार आहे. माझ्या प्रकृतीची चिंता करणाऱ्या सर्व नागरिकांचे, कार्यकर्त्यांचे आणि हितचिंतकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.'' उपचारादरम्यान विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी रूबी हॉल क्लिनिक येथे भेट देऊन खासदार लंके यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच राज्यभरातून कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांच्या लवकर प्रकृती सुधारण्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. रुग्णालयातून डिस्चार्ज घेताना खासदार लंके यांनी त्यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर, परिचारिका तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे आभार मानत उपचारादरम्यान घेतलेल्या काळजीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## ॲड.अच्युत सदाशिव पिंगळे यांचा सहस्त्रचंद्रदर्शन गौरव सोहळा व ''समर्पित'' गौरवांकाचे प्रकाशन

सन्मानपत्राचे वाचन केले.शारदा होशिंग यांनी सूत्रसंचालन केले तर अँड.पी.व्ही.जोशी यांनी आभार मानले.आमदार संग्राम जगताप यांनीही आवर्जून उपस्थित राहून अँड.पिंगळे यांचे अभिष्टचिंतन केले.

अर्बन बँक सुरू करण्याचे ध्येय- ॲड. पिंगळे

गौरव सोहळ्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून ॲड. पिंगळे यांनी नगर अर्बन बँकेतील गैरव्यवहाराशी दिलेल्या लढ्याच्या आठवणी जागवल्या. माझ्याच पक्षाच्या कार्यकर्त्याने केलेल्या भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा अनेक संघर्षातून मला द्यावा लागला, असे स्पष्ट करताना नगर अर्बन बँक पुन्हा सुरू करणे हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी भारतीय वायू दलातील सेवा, नंतर केलेली वकिली, शहरातील राष्ट्रपुरुषांचे पुतळे व त्यामागील इतिहास तसेच संघ कार्यासाठी ९०० गावांना दिलेल्या भेटीच्या आठवणी सांगितल्या.

त्यांच्यावर पुस्तक लिहा - प्रा. शिंदे

भाजपा आज सत्तेत आहे. अनेक नवे लोक पक्षाशी जोडले गेले आहेत. आमच्या वाडवडिलांपासून आम्ही कसे संघवाले आहोत, हे ते आता आवर्जून सांगतात. परंतु पूर्वी याच मंडळींनी संघ स्वयंसेवक व भाजपच्या लोकांना कसा त्रास दिला हे सर्वांना माहीत आहे. त्यामुळे त्यावर ॲड. पिंगळे यांनी आता एक पुस्तक लिहावे, असे आवाहन सभापती प्रा. शिंदे यांनी यावेळी केले. पक्षात नवे आलेले अनेक जण आम्ही पंचम वर्ष वर्ग शिक्षित असल्याचे सांगतात,परंतु संघात फक्त तृतीय वर्ष वर्ग असतात हेच त्यांना माहीत नाही व यातूनच त्यांचे बेगडी पण स्पष्ट होते, असे प्रा.शिंदे म्हणताच हास्यकल्लोळ व टाळ्यांचा गजर झाला. त्यांच्यावर पुस्तक लिहिण्याच्या प्रा.शिंदे यांच्या आवाहनास अँड.निकम यांनीही पाठिंबा जाहीर केल्याने त्यालाही टाळ्यांची दाद मिळाली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी गौरव समितीचे अशोक बकोरे, सदाशिव देवगावकर,विलास कुलकर्णी,अवधूत कुक्कडवाल, विद्याताई पोतदार,बाळासाहेब भुजबळ,दिनकर देशमुख, श्रीमती सुमनताई जाधव आदींनी परिश्रम घेतले.